# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-३०** **दिनांक - ०२/०२/२०२४**

## ०२ लाख रुपये किंमतीचा १० किलो वजनाचा गांजा नामक अंमली पदार्थासह आरोपीतास अटक
## विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक- ०१/०२/२०२४ रोजी १४:३०वा.चे सुमारास विरार वजन काटा, चंदनसार रोड, विरार(पु.), ता.वसई येथे एक इसम गांजा नावचा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर बातमी विरार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाल्याने, सदर बातमीचे आधारे मिळालेले बातमीचा आशय मा.वरिष्ठांना कळवुन, वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना व आदेशान्वये लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपीतांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीत याने त्याचे नाव- **विकास मौर्या, वय-२६ वर्षे**, रा.अंधेरी(पु.), मुंबई असे सांगितले. नमुद आरोपीताची अंगझडती घेतली असता, त्यांचे कब्जात **१० किलो वजनाचा एकुण-२,००,०००/- रुपये किंमतीचा गांजा नावाचा अंमली पदार्थ,** मिळुन आल्याने, तो जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं. II ८४/२०२४, गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ (NDPS) अधिनियम-१९८५ चे कलम-८(क), २०(ब), ii(ब) प्रमाणे दि.०१/०२/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, व प्रफुल सोनार, सर्व नेम.विरार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


मिरा-भाईंदर - वसई - विरार
पोलीस आयुक्तालय